




# पारनेर दर्शन








वर्ष १ अंक ३५८, बुधवार ३० ऑक्टोबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# मतदारसंघात परिवर्तन करण्यासाठी माझी उमेदवारी

## ■ काशिनाथ दाते यांचे प्रतिपादन ■ दाते यांचा अर्ज दाखल

पारनेर : विशेष प्रतिनिधी

**मतदारसंघात परिवर्तन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादांनी मला उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. या परिवर्तनात तुम्ही सर्वजण सहभागी होणार आहात. जागा राष्ट्रवादीला मिळाल्यानंतर कोणाला उमेदवारी द्यावी असा प्रश्न होता. महायुतीमधील घटक पक्षाच्या पक्षाच्या तीनही पक्षाच्या टीमने केलेल्या सर्वेक्षणानुसार उमेदवारी निश्चित करण्यात आल्याचे महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी सांगितले.**

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांचा उमेदवारी अर्ज मंगळवारी महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला. अर्ज दाखल करण्यापूर्वी शहराच्या लाल चौकात झालेल्या कॉर्नर सभेत दाते हे बोलत होते. सभेनंतर मिरवणूकीने जात दाते यांनी अर्ज दाखल केला.

यावेळी बोलताना दाते म्हणाले, सुजित झावरे, माधवराव लामखडे, विजय औटी उमेदवारीच्या स्पर्धेत होते. गेली ४० .वर्षे तालुक्याच्या राजकारणात मी काम केले आहे. सन १९८० पासून मी समाजाकारण, राजकारणास सुरूवात केली. कै वसंतराव झावरे, कै.मार्तंडराव पठारे, कै. बाबाशेठ कवाद, कै. बाबासाहेब ठुबे यांच्या नेतृत्वाखाली तसेच त्यांच्या सानिध्यात मी अनेक वर्षे काम केले. त्या माध्यमातून जिथे जिथे विकास करता येईल तो प्रयत्न मी केला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससोबत मी काम केले. १९९९ मध्ये राष्ट्रवादीसोबत काम सुरू केले. पक्षाचे तालुक्याचे अध्यक्षपदही भुषविले. संघटना मजबुत केली. ते करताना आमच्या नेतृत्वाने कधीही कोणावर अन्याय केला नसल्याचे दाते म्हणाले.

यावेळी वसंत चेडे, गणेश शेळके, राहुल शिंदे, राजाराम एरंडे, सुभाष दुधाडे, दत्ता पवार, अशोक चेडे, सुनील थोरात, रामचंद्र मांडगे, सुरेश बोऱ्हुडे, दादा वारे, दिनेश बाबर, छबू कांडेकर, लहू भालेकर, कृष्णाजी बडवे,विकास सावंत, राजेश गोपाळे, बाळासाहेब लामखडे, दत्ता आवारी यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. विक्रम कळमकर यांनी सुत्रसंचलन केले.




■ पारनेर शहराच्या लाल चौकात कॉर्नर सभा झाल्यानंतर काशिनाथ दाते यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

### पाच वर्षापूवची चुक सुधारण्याची संधी

विजय औटी, नंदकुमार झावरे, वसंतराव झावरे यांच्यासोबत काम करण्याची मला संधी मिळाली. मला काम करण्याचा अनुभव आहे. पाच वर्षापूवची चुक दुरूस्त करण्याची या निवडणूकीत संधी संधी आहे. आपल्या तालुक्याला सुसंस्कत राजकरणाचा वारसा आहे. तरूणांनी सुसंस्कत होण्याची गरज असून ज्येष्ठांनी त्यांना सल्ला देण्याचे आवाहन दोत यांनी केले. ठरावीक टोळी एमआयडीसीसीमध्ये उडया मारत आहे. तेथील दादागीरी थांबवावी लागेल. ग्रामपंचायत सोसायायटीच्या निवडणूकीत हस्तक्षेप केला जात आहे. बाहेरची माणसे, टोळया पाठवून गावपातळीवरील राजकारणात हस्तक्षेप केला जात आहे. गावागावात घराघरात भांडणे लावून स्वतःची डाळ शिवजून घेणारांचा धंदा बंद करण्याची आता वेळ आली असल्याचे दाते यांनी सांगितले.

### अधिकारी, डॉक्टरांना मारहाण

जल जीवन मिशनचे कोटयावधी रूपयांचे टेंडर आहे. मात्र त्याच्या दर्जाबाबात विचारणा केली असता दमबाजी केली जाते. अधिकारी डॉक्टरांना मारहाण केली जाते ते आपण सहन करतो आहोत, हे थांबविण्यासाठी या निवडणूकीत परीवर्तनाची संधी मिळाली असल्याचे दाते म्हणाले.

### बुथवर लक्ष केंद्रीत करा

प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या बुथवर जाऊन आपण त्या बुथवर का मागे आहोत याचा अभ्यास करून त्या बुथवर दाते सरांना सर्वाधिक मतदान कसे होईल याचे नियोजन करावे. तुम्ही २० .तारखेपर्यंत काम करा, पुढील पाच वर्षे दाते सर आणि आम्ही सर्वजण तुमच्यासाठी योगदान देऊ.

विश्वनाथ कोरडे

### दोन वर्षात ३०० कोटींचा निधी

तालुक्याच्या विकासाची परंपरा विजय औटी हे आमदार असेपर्यंत सुरू होती. बांधकामचा सभापती म्हणून काम करण्याची संधी मिळाल्यानंतर संपूर्ण तालुक्यात विकास कामे केली. मला दोन वर्षासाठी एक पद मिळाले २०० ते ३०० कोटी रूपयांचा निधी तालुक्यासाठी खेचून आणले, पाच वर्षात हे कौशल्य कोणीही वापरले नसल्याचे दाते यांनी सांगितले.

### एमआयडीसीच्या जिवावर उडया मारत आहेत

स्व.वसंतराव झावरे, नंदकुमार झावरे, स्व. बाळासाहेब विखे यांच्या नेतृत्वाखाली सुपा-पारनेर एमआयडीसीची स्थापना झाली. आज मात्र त्याच एमआयडीसीच्या जिवावर काही लोक उडया मारत आहेत. ते थांबविण्यासाठी या निवडणूकीत परिवर्तन गरजेचे असल्याचे दाते म्हणाले.

### दादांना दिलेला शब्द पाळा

काही लोक व्यासपीठावर नाहीत. त्यांची नाराजी निश्चित दुर करण्यात येउन पुढील काळात तिघेही आपल्या सोबत दिसतील. आमची एकी आहे, बेकी नाही. महायुतीतील सर्व घटक पक्ष आपल्यासोबत आहेत. जनतेबरोबर येण्याचा निर्णय घ्या आणि दादांना दिलेला शब्द पाळा असे आवाहन दाते यांनी केले.

### लोकसभेला झालेली चुक सुधारायचीय

महायुतीच्या सरकारचे काम घराघरापर्यंत पोहचवा लोकसभेचा निकाल आपल्या हालगजपणामुळे गेला. कोणी कार्यकर्ता घराघरापर्यंत पोहचला नाही. आम्हीही केवळ गावागावात बैठका घेतल्या. आता बुथ कमिटयांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहचा राधाकष्ण विखे, डॉ. सुजय विखे यांनी कोटयावधींची कामे केली. तरीही पराभव झाला ही चुक सुधारण्यासाठी या निवडणूकीचे सुक्ष्म नियोजन केले तर आपण विजयापर्यंत पोहचल्याशिवाय राहणार नाहीत. केंद्राच्या ज्या विचाराचे सरकार त्याच विचारांचे सरकार राज्यात हवे त्याच विचारांचा आमदार मतदारसंघात हवा.

काशिनाथ दाते
उमेदवार

### महायुतीच्या योजना जनतेपर्यंत पोहचवा

महायुती सरकारने राबविलेल्या योजना मुर्त स्वरूपात आल्या आहेत. कार्यकर्त्यांनी या योजना जनतेपर्यंत पोहविण्याचे काम केले पाहिजे. महिलांनीही महायुतीच्या योजनांचा प्रचार प्रसार करावा. नवरात्रातील देवीच्या दर्शनापेक्षा दरमहा मिळणारे दिड हजार रूपये मोठे आहेत.महिलांना भावनिक करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगत दाते यांनी खा. नीलेश लंके यांच्यावर अप्रत्यक्ष निशाणा साधला.

### अजितदादांचा उमेदवार

गेल्या २०१९ च्या निवडणूकीत घडयाळाच्या चिन्हावर उमेदवार विजयी झाला आहे. यंदाही घडयाळाच्या चिन्हावर अजित पवार यांचा उमेदवार उभा असून मतदारांनी अजितदादांच्या उमेदवाराला मोठया मताधिक्क्याने विजयी करावे. मतदारांनी काशिनाथ दाते यांना विजयी करावे, अजित पवार तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाहीत. सोशल मीडियाच्या मेसेजकडे लक्ष न देता दाते सरांना मताधिक्क्याने विजयी करण्यासाठी परीश्रम करा.

संध्या सोनवणे
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी युवती काँग्रेस

### स्वाभिमानी महिला दातेंना साथ देतील

काशिनाथ दाते यांचा विजय निश्चित असून त्यांच्या विजयाची केवळ औपचारीकता बाकी आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेमुळे महिलांना साडेसात हजार रूपये मिळाले असून पारनेरच्या स्वाभिमानी महिला काशिनाथ दाते यांच्या पाठीशी खंबिरपणे उभ्या राहतील.

अश्विनी थोरात
जिल्हाध्यक्ष भाजपा महिला आघाडी

### शेतकऱ्याला उमेदवारी, दादांचे आभार

सर्वसामान्य शेतकऱ्यांचा पारनेर तालुका ही पारनेर तालुक्याची ओळख असलेल्या या मतदारसंघात काशिनाथ दाते यांच्या रूपाने एका शेतकऱ्याला उमेदवारी दिल्याबद्दल मी अजित पवार यांचा आभारी आहे.

प्रशांत गायकवाड
संचालक, जिल्हा बँक

### ज्येष्ठांनी नाराजी दुर करावी

काशिनाथ दाते यांना उमेदवारी जाहिर झाल्यानंतर काही लोकांमध्ये नाराजी असून ती दुर करण्याची जबाबादारी ज्येष्ठांवर आहे. ज्यांना अन्याय झाला असे वाटतो त्यांना एकत्र बसवा. त्यांना मानाचे स्थान द्या. सर्वजण एकत्र आले तर दाते यांचा पराभव कोणीही करू शकत नाही. तालुका सुसंस्कत नेतत्वाच्या हातामध्ये देण्यासाठी अनेक जण राजकीय मतभेद विसरून एकत्र झाले आहेत.

सचिन वराळ
सदस्य, ग्रामपंचायत, निघोज

---

# पारनेर-नगर विधानसभेसाठी २३ अर्ज दाखल

■ अखेरच्या दिवशी १६ अर्ज दाते, झावरे, पवार, लामखडे, कार्ले, औटी यांचा समावेश
■ ४८ व्यक्तींकडून ८१ अर्जांची खरेदी ■ मंगळवारी ७ व्यक्तींनी केली ८ अर्जांची खरेदी

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर विधानसभा मतदासंघामध्ये मंगळवारी, अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी तब्बल १६ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यामुळे एकूण अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांची संख्या २३ इतकी झाली आहे.**

महायुतीच्या उमेदवाराची घोषणा होण्यास विलंब झाल्याने अर्ज दाखल करण्यास प्रारंभ होउनही महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके तसेच शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. श्रीकांत पठारे यांनी बंडखोरी करत अर्ज दाखल केला होता. इतर पाच अपक्षांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

रविवारी राष्ट्रवादी काँग्रेसअजित पवार पक्षाची उर्वरीत पान ३ वर



### यांनी दाखल केले अर्ज

राणी नीलेश लंके महाविकास आघाडी, काशिनाथ महादू दाते महायुती, अविनाश मुरलीधर पवार मनसे, डॉ. श्रीकांत तानाजी पठारे अपक्ष, विजय भास्कर औटी अपक्ष, सुजित वसंतराव पाटील अपक्ष, माधवराव भाऊसाहेब लामखडे अपक्ष, संदेश तुकाराम कार्ले अपक्ष, शंकरप्रसाद दिगंबर गंधे अपक्ष, खंडू विठ्ठल भुकन अपक्ष, विजय सदाशिव औटी अपक्ष, प्रविण सुभाष दळवी अपक्ष, ज्ञानदेव कोंडीबा जगताप अपक्ष, भाउसाहेब महादू खेडेकर अपक्ष, रविंद्र विनायक पारधे अपक्ष, सचिन एकनाथ कोकाटे अपक्ष, सखाराम मालू सरक अपक्ष, ज्ञानेश्वर संजय भोगाडे अपक्ष, अविनाश उत्तम थोरात अपक्ष, सचिन कोकाटे अपक्ष, भाऊसाहेब बाबाजी जगदाळे भारतीय जवान किसान पार्टी.

# लामखडे, कार्ले, औटी यांचे शक्तीप्रदर्शन करीत अर्ज दाखल

■ उमेदवारांच्या रॅलींमुळे पारनेरात वाहतूकीची कोंडी
■ सुजित झावरे, अविनाश पवार यांचेही अर्ज दाखल

पारनेर : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणूकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी पारनेर-नगर मतदार संघात माधवराव लामखडे, संदेश कार्ले विजय सदाशिव औटी यांनी मंगळवारी शक्तीप्रदर्शन करीत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान, सुजित झावरे व मनसेचे उमेदवार अविनाश पवार यांनी थेट निवडणूक निर्णय अधिका-यांच्या दालनात जात आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.**

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते व विजय औटी यांच्या स्वतंत्र रॅली तसेच माधवराव लामखडे व संदेश कार्ले यांच्या एकत्रीत रॅलींमुळे



पारनेर शहरात बसस्थानक परिसरात वाहतूकीची कोंडी झाली होती.

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी सकाळी दहा वाजता रॅलीने जात अर्ज दाखल करण्याचे जाहिर केले होते. रॅलीपूर्व त्यांची शहराच्या लाल चौकात कॉर्नर सभा पार पडली. सभेनंतर दाते समर्थकांसह रॅलीने तहसिल कार्यालयात पोहचले व त्यांनी त्यांचा अर्ज दाखल केला.

अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल उर्वरीत पान ३ वर




# तंत्रमंत्र

## विज्ञानयुगातील बितंबातम्या

**ई-मेल, एसएमएस, फेसबुक, व्हॉट्स ॲप... जग जवळ आल्याने एका क्लिकने संपर्क साधणं सहज होतंय. ऑफिसची कामं अनेकदा प्रत्यक्ष उपस्थितीपेक्षा ई-मेल, व्हॉट्स ॲपवर फॉर्वर्ड होऊ लागली. प्रसंगी दहा दहा किंवा जास्त मंडळीही फोनवरच 'मीटिंगा' आटपायला लागली. झटपट निर्णय घेणे, कामाला गती येणं, त्यातून खूप चांगल्या, उपयुक्त गोष्टी घडणं होऊ लागलं. व्यावहारिक जगात या सगळ्याच संपर्कसाधनांनी खूप मोठा बदल घडवला. त्यामुळे एका बाजूला विकास घडत आहे, पण त्याहीपेक्षा मोठी उलथापालथ होते आहे ती मानवी नातेसंबंधात! त्यातली एक म्हणजे जोडीदारांमधील दुरावा. गेल्या काही महिन्यांत मोबाइल, सोशल नेटवर्किंगमुळे दुरावा आलेल्या जोडप्यांच्या प्रमाणात वाढ होऊ लागलीय. हे वापरणाऱ्यांनी वेळीच स्वतःवर निर्बंध घालणं हे कुटुंबाच्या सौख्यासाठी महत्त्वाचं आहे...**



## 'लाइक्स'चा व्हायरस

कामाच्या व्यापात महिनोन्‌महिने भेटायला तर सोडाच फोनवर बोलायलाही न मिळालेली नाती व्हॉट्स ॲप, फेसबुकमुळे रोजच्या रोज संपर्कात राहू लागली. अनेक वर्षे न भेटलेल्या शाळा, कॉलेजमधल्या मित्र-मैत्रिणींच्या अखंड नात्याच्या झरा पुन्हा खळखळून वाहू लागला, तर दुसऱ्या बाजूला नवी नाती निर्माण झाली. ई-मेल आयडी, मोबाइल नंबरची देवाणघेवाण नात्याला वेगळं वळण देऊ लागली. एका 'लाइक'ने नात्याला वेगळं परिमाण मिळू लागलं, मुख्य म्हणजे डिलीटचं बटण 'प्रायव्हसी' अबाधित ठेवू लागलं. नात्यात आणि म्हणूनच मग भाषेतही जरा मोकळेपणा.. मग जरा जास्तच मोकळेपणा आला. 'लव्ह यू' शब्द 'डीअर'च्या पंक्तीत बिनदिक्कत जाऊन बसला. व्यक्तिगत आयुष्य, व्यक्तिगत प्रश्नाचं शेअरिंग नात्याला घट्ट करत गेलं... काळाच्या ओघात जे नवऱ्याकडून वा बायकोकडून अपेक्षित होतं ते मित्राकडून वा मैत्रिणीकडून अपेक्षिलं जाऊ लागलं. आयुष्य पुन्हा एकदा हवंहवंस वाटू लागलं. नवरा-बायकोच्या नात्यातील कसर दुसऱ्या नात्याने भरून जायला लागली. घरातल्या घरात दोन स्वतंत्रपणे जगणारी, स्वतःची 'स्पेस' सांभाळणारी बेटं तयार झाली. आपल्याच आयुष्यात रमणारी! त्यातून एका बाजूला प्रेमाचं नातं तर काही ठिकाणी आपल्या जोडीदाराबद्दल संशयाचं, उपेक्षेचं नातं निर्माण झालं. काही वेळा राईचा पर्वत केला गेला आणि यातूनच निर्माण झाले गुंते.. काहींनी विवेकाचा वापर करत तिथेच थांबायचा... नात्याला वेगळं रूप न द्यायचा निर्णय घेत माघार घेतली. काहींनी नीट 'हॅण्डल' केलं प्रकरण! पण काही गुंते मात्र इतके वाढले की समुदेशकांपर्यंत पोहोचले.



### सहवास आहे पण संवाद नाही!

हल्लीच्या वेगवान आयुष्यात कुटुंबाला, एकमेकांना द्यायलाच आधी वेळ कमी मिळतो. त्यात पूर्वी या सोशल साइटस् फक्त इंटरनेटद्वारे संगणकावर उघडता यायच्या. घरात एकच संगणक, त्यामुळे घरी दमून आल्यावर संगणक उघडून चॅटिंग करण्याचा उत्साह तुलनेत कमी असायचा. पण आता स्मार्टफोन, टॅब, आयपॅडवरही निःशुल्क ॲप्स मिळत असल्यानं संपर्क अहोरात्र सहज करता येऊ लागला. किंबहुना तुम्ही सतत ऑनलाइन असता आणि म्हणूनच सतत दुसऱ्यांच्या नजरेखालीही असू शकता. तुम्ही इंटरनेट कनेक्शन बंद केलं तरच तुमचा संपर्क तुटतो. म्हणूनच हल्ली अनेकांचा दिवस एकमेकांना गुड मॉर्निंग स्माइली पाठवून सुरू होतो आणि गुड नाइटच्या स्माइलीने संपतो. पण विरोधाभास असा की इतरांना या 'स्माइली' पाठविताना बेडरूममध्ये असलेल्या आपल्या जोडीदाराला मात्र प्रत्यक्षात 'गुड मॉर्निंग', 'गुड नाइट' फारच अभावानं म्हटलं जातं, म्हणजेच सहवास आहे, पण संवाद नाही! तो संवादच महत्वाचा, कारण आयुष्य सतत स्माइली (आनंदी) नसतं. कुटुंबातील, व्यक्तिगत जीवनातील अनेक निर्णय एकमेकांशी चर्चा, वाद-विवाद करून घ्यावे लागतात, पण या सततच्या चॅटिंग, ऑनलाइन राहण्यानं साधे-मोठे निर्णय घेताना पूर्ण लक्ष नसतंच, मग त्यांच्या जोडीदाराची चिडचिड व्हायला लागते.

### चॅटपूर्वी या गोष्टी कराच...



- सोशल नेटवर्किंगसाठीची वेळ निश्चित करा व ती पाळा.
- व्यक्तिस्वातंत्र्य, नात्यात दिलेली स्पेस, मान्य करूनही जोडीदारांतील एकमेकांचा विश्वास टिकविण्यासाठी आपले मित्र- मैत्रिणी एकमेकांना सांगा व फॅमिली फ्रेंड बना. गैरसमज टाळता येतात.
- मित्रपरिवाराशी चॅटिंग करताना आणि ती पोस्ट करताना एक क्षण थांबून विचार करा. त्यातून गैरसमज होणार नाही ना!
- इतका मोकळेपणा ठेवूनही जोडीदारापैकी कुणाला एखाद्याशी चॅटिंग करणे पसंत नसेल तर कुटुंबातली नाती टिकविण्यासाठी चॅटिंगचा अट्टहास हवाच का याचा गंभीरतेने विचार करा.
- नात्यातील बदलांना सामोरे जाताना भावनिक विचार न करता विवेकी विचारांनी वागून जोडीदारांशी प्रत्यक्ष संवाद वाढवून नाती व विश्वास अधिक बळकट करा.



# लिफ्टचा वापर करताना...

**लिफ्ट वापरताना साध्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्यास सुरक्षिततेची खात्री देता येऊ शकते. त्यासाठी लिफ्टचा योग्यप्रकारे वापर कसा करावा, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे, शिवाय लिफ्ट बंद पडल्यानंतर काय करावे, हेसुद्धा जाणून घेणे आवश्यक आहे...**

### महत्त्वाच्या सूचना...

तुमचे गंतव्यस्थान निश्चित करा. तुम्हाला ज्या दिशेने जायचे आहे, त्याकरिता लिफ्टला बोलावण्याचे बटन एकदाच दाबा. लिफ्ट येत आहे, यासंदर्भातील सिग्नल पाहा किंवा ऐका. लिफ्टमधून बाहेर पडणाऱ्या प्रवाशांकरिता मार्ग मोकळा ठेवा. जर आलेली लिफ्ट भरलेली असेल, तर दुसऱ्या लिफ्टची वाट पाहा. हात, पाय, काठी इत्यादींसारख्या व इतर कोणत्याही वस्तूसह लिफ्टचे बंद होणारे दरवाजे थांबवण्याचा प्रयत्न करू नका. दुसऱ्या लिफ्टची वाट पाहा. काळजीपूर्वक लिफ्टमध्ये प्रवेश करा व बाहेर पडा. दरवाजाजवळ उभे असलेल्या प्रवाशांनी प्रथम प्रवेश करावा किंवा बाहेर पडावे. आत आल्यानंतर, त्वरित तुम्हाला ज्या मजल्यावर जायचे आहे, त्याकरिता बटन दाबावे आणि दुसऱ्या प्रवाशांकरिता मार्ग मोकळा करण्याकरिता मागील बाजूस सरकावे. लहान मुले व पाळीव प्राण्यांना घट्ट धरा. कपडे व सामान लिफ्टच्या दरवाज्यापासून दूर ठेवत सुरक्षित अंतर ठेवा. लिफ्टचा दरवाजा उघडाच ठेवण्याकरिता डोअर ओपन बटन दाबून धरून ठेवा किंवा दुसऱ्या कोणा व्यक्तीला बटन धरून ठेवण्याकरिता सांगा.

### लिफ्टमध्ये अडकले तर...

लिफ्ट तंत्रज्ञांकडून साहाय्य प्राप्त करण्याकरिता अलार्म बटन दाबा. जे लिफ्टमधून बाहेर पडण्यास प्रवाशांना मदत करतील. जर लिफ्टमधील कंट्रोल्समधून संवाद साधण्याकरिता कोणताच मार्ग उपलब्ध नसेल तर लिफ्टमध्ये दर्शविण्यात आलेल्या इमर्जन्सी क्रमांकावर संपर्क साधण्याकरिता मोबाइल फोनचा वापर करा. लिफ्ट तंत्रज्ञांशी बोलताना, त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करा. यामुळे लिफ्टमधून बाहेर पडण्याच्या प्रक्रियेला गती मिळण्यास मदत होईल. जबरदस्तीने लिफ्टचे दरवाजे उघडण्याचा प्रयत्न करू नका. लिफ्टमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करू नका. शांत राहा आणि मदतीची वाट पाहा.

### हे करू नका...

जाणकार नसलेल्या व्यक्तीने लिफ्टमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका करण्याचा प्रयत्न करू नये. लिफ्टमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका करणे, ही पात्र तंत्रज्ञांची जबाबदारी आहे. फ्रंट दरवाजापासून दूर राहा आणि सूचना मिळत नाही तोपर्यंत कोणत्याही बटनाला स्पर्श करू नका.

### लक्षात ठेवण्याच्या महत्त्वपूर्ण बाबी...

१ लिफ्टला जोडण्यात आलेली दोरी तुटणार नाही याची काळजी घ्यावी.

२ लिफ्टला एकापेक्षा अधिक दोरी किंवा बेल्ट जोडण्यात यावेत.




### हे करा व हे करू नका...

भूकंप, विजा चमकणे, पूर, आग लागली असेल तर लिफ्टचा वापर करू नका. या घटना घडत असताना जिन्याचा वापर करा. कारण या घटनांमुळे इलेक्ट्रिकल सेवेमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो. लोड मर्यादा व प्रवासी क्षमता मर्यादेचे काटेकोरपणे पालन करा. जबरदस्तीने लिफ्टचे दरवाजे उघडू नका. लिफ्टमधून जात असताना लहान मुलांसोबत प्रौढ व्यक्तीने असणे गरजेचे आहे. लिफ्ट कार व हॉल यांच्यामध्ये असलेल्या पोकळीमध्ये कोणत्याही वस्तू टाकू नका.

### लिफ्टमधून जात असताना...

लिफ्टच्या दरवाजांपासून दूर उभे राहा. उपलब्ध असल्यास रेलिंग धरून ठेवा. मजल्यांचे संकेत देणाऱ्या सूचनांकडे लक्ष ठेवा आणि तुमचे गंतव्यस्थान येताच लिफ्टमधून बाहेर पडण्याकरिता सज्ज राहा. लिफ्ट थांबल्यानंतर दरवाजा उघडला नाही, तर डोअर ओपन बटन दाबा. तरीदेखील जर दरवाजा उघडला नाही, तर अलार्म बटन दाबा किंवा टेलिफोन किंवा इंटरकॉमचा वापर करा. योग्य व्यक्ती तुम्हाला मदत करण्यास येईपर्यंत वाट पाहा.

# सोप्या पद्धतीनं करा फोटो एडिटिंग



**एक काळ असा होता जेव्हा फोटोज काढण्यासाठी कॅमेरे मग त्यात रोल आणि कितीतरी गोष्टी लागायच्या. पण एका स्मार्टफोनमुळे हे सारंकाही बदललं. आता कुठेही आपण असलो तरी फोटोसाठी मोबाईल फोनच वापरतो. स्मार्टफोनमुळे फोटो काढणं आणि ते शेअर करणं फारच सोपं झालं आहे. आता तुम्हालादेखील जर इन्स्टाग्राम, फेसबुक इत्यादी प्लॅटफॉर्मवर फोटो शेअर करायला आवडत असतील, तर तुमचे फोटो तसेच भारी दिसावेत असं तुम्हाला वाटत असेल, तर काढलेले फोटो आणखी भारी दिसावेत यासाठी त्यांना एडिट करतात. आता मार्केटमध्ये असणारे सोपे काही फोटो एडिटर ॲप तुम्हाला सांगणार आहोत.**

### Picsart

मोबाईलमध्ये मोठ्या प्रमाणात फोटोला एडिट करण्यासह अनेक फोटोंचं कोलाज बनवण्यासाठी हे Picsart AI Photo Editor ॲप वापरतात. हे प्ले स्टोअरवरून कोट्यवधीवेळा डाउनलोड केले गेले आहे. फोटो एडिटिंगसाठी या ॲपमध्ये बऱ्याच खास गोष्टी आहेत. यात तुम्ही फोटोसह फोटो इफेक्ट्स आणि फिल्टर्सचा वापर करून पाहू शकता. तसेच, तुम्ही बॅकग्राउंडही बदलू शकता.

### Snapseed

खास करून गुगलचंच हे एक उत्कृष्ट फोटो एडिटिंग ॲपआहे. हे ॲप व्यावसायिक वापरकर्त्यांसाठी अधिक उपयुक्त आहे. या ॲपला Google Play Store वरून ते १०० दशलक्षाहून अधिक वेळा डाउनलोड केले गेले आहे. या ॲपच्या मोबाईलचा मोबाईल एडिटिंग इंटरफेस अतिशय सोपा आहे, ज्यामुळे तो फोटोग्राफर आणि एडिटिंग करणाऱ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

### PhotoShop

जेव्हा फोटो एडिटिंगचाविषय निघतो तेव्हा Adobe फोटोशूट प्रामुख्याने आठवतं. मोठ्या लेव्हलला एडिटिंग फोटोशॉपने होत असून याचं मोबाईल व्हर्जनही आहे. वापरायला सोपं पण सोबतच दमदार फीचर्ससह हे ॲप येत असून गुगल प्ले स्टोअरवरून ते लाखाहून अधिक वेळा डाउनलोड केले गेले आहे.

### Pixlr

Pixlr हे देखील एक भारी आणि लोकप्रिय फोटो एडिटिंग ॲप आहे. हे गुगल प्ले स्टोअरवरून ५० दशलक्ष वेळा डाउनलोड केले गेले आहे. हे विनामूल्य आणि सशुल्क अशा दोन्ही व्हर्जनमध्ये येते. Pixlr ची विनामूल्य आवृत्ती फिल्टर आणि काही मूलभूत फीचर्सचा वापर करु देते. तर पेड व्हर्जनमध्ये आणखी भारी फीचर्स दिले गेले आहेत.

### Adobe Photoshop Lightroom

एकीकडे Adobe चं फोटोशॉप ॲप असताना Adobe Photoshop Lightroom देखील एक भारी आणि पावरफुल फोटो आणि व्हिडिओ एडिटिंग ॲप आहे. Google Play Store वरून ते १०० दशलक्षाहून अधिक वेळा डाउनलोड केले गेले आहे. यामध्ये तुम्ही इमेज एडिटर आणि फोटो फिल्टर्स देखील वापरू शकता.

# खतरनाक व्हॉट्स ॲप पिंक व्हायरस; इन्स्टॉल करताच मोबाइल हॅक

**व्हॉट्स ॲप पिंक व्हायरस पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे. व्हायरल होणाऱ्या लिंकमधून व्हॉट्स ॲपचे नवे व्हर्जन इन्स्टॉल करण्यास सांगितले जाते व क्षणार्धात सायबर गुन्हेगार तुमचा मोबाइलच हॅक करतात. व्हॉट्स ॲपला सातत्याने अपडेट येतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या व्हॉट्स ॲपच्या नवीन व्हर्जनची लिंक फॉरवर्ड होण्यास सुरुवात झाली आहे. यात ॲपचा हिरवा रंग बदलून गुलाबी रंगात बदलतो, असे सांगून वापरकर्त्यांना आकर्षित केले जाते. तज्ञांच्या मते, एका विशिष्ट कालावधीनंतर अशा व्हॉट्स ॲप लिंक व्हायरल होत आहेत. परंतु त्या पूर्णपणे खोट्या आहेत. २०२१ मध्ये सर्वप्रथम व्हॉट्स ॲप पिंक हा व्हायरस इंटरनेटच्या जगतात आला. तेव्हाही राज्यभरात हजारो नागरिक याला बळी पडले होते.**

### इन्स्टॉल केल्यास नेमके काय होते ?

व्हॉट्स ॲप पिंक लिंक सध्या फिरत आहे. सोशल मीडियावर स्क्रोल करतानादेखील तुम्हाला त्याची जाहिरात प्राप्त होऊ शकते. त्यावर क्लिक करताच तेथून तुम्हाला लिंक अनोळखी संकेतस्थळावर घेऊन जात एपीके फाइल इन्स्टॉल करण्यास सांगते. त्याद्वारे ॲप इन्स्टॉल होताच मोबाइलमधील संपर्क क्रमांक, फाइल मॅनेजर, व्हॉइस, लोकेशनची परवानगी मागते. सहसा वापरकर्ते ते सर्व मान्य करत पुढे जातात व काही क्षणात तुमच्या मोबाइलचा ताबा पूर्णपणे सायबर गुन्हेगारांच्या हाती जातो.

### तुमच्या माहितीचा अनेक मार्गाने होतो वापर

- मोबाईलमधील संपर्क क्रमांक, त्यातील होणाऱ्या चर्चा, ग्रुपचे नावे आदी माहिती डेटा म्हणून वापरला जातो. तो सायबर जगतात लाखो रुपयांना विकला जातो.
- मोबाईल हॅक केल्यानंतर तुम्ही करत असलेले ऑनलाईन व्यवहार हेरून पैसे लंपास केले जाऊ शकतात.
- बदनामीसाठी हे प्रयोग होतात. त्यातून तुमच्या नावाने कुठलाही गैरप्रकार, चुकीचे मेसेज पाठवले जातात.
- कुठलेही ॲप इंस्टॉल करताना ते मोबाईल ऑपरेटिंग सिस्टीमच्या अधिकृत ॲपमधूनच इंस्टॉल करा. त्याच्या खालील त्याचा रिव्ह्युव्हज आवर्जुन वाचा.




### चूक झाल्यास...

चुकून असे ॲप, लिंक इंस्टॉल झाल्यास तत्काळ ते ॲप अनइन्स्टॉल करा, व्हॉट्स ॲप पिंक ॲप हे हाईड होऊन जाते. ते हाईड झाल्यास मोबाईल सेटिंग-ॲप्स या पर्यायात जाऊन या नावाचे ॲप काढून टाका. सर्व ॲपला दिलेल्या परवानग्या (परमिशन) रिमूव्ह करा. सेटिंगमध्ये जाऊन ब्राऊजर कॅचे क्लिअर करा.

## शॉर्ट न्यूज

### नगरला स्वर दीपावली कार्यक्रमाचे आयोजन

**नगर :** शहरातील सप्तसूर परिवाराच्या वतीने बुधवारी (दि. ३० ऑक्टोबर) पहाटे ६ : ३० वाजता स्वर दीपावली हा सुमधुर मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सावेडी येथील माऊली संकुल सभागृहात रंगणार आहे. संगीत, गायन क्षेत्रात योगदान देणारे अहिल्यानगर मधील प्रतिष्ठित डॉक्टर आपल्या कलेचे सादरीकरण या कार्यक्रमात करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी निशुल्क असून, कलाप्रेमी नागरिकांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन सप्तसूरच्या वतीने करण्यात आले आहे.

### पवार यांच्या मृत्यूस कंत्राटदार जबाबदार

**नेवासा :** तालुक्यातील वडाळा महादेव येथील महावितरण कंपनीचे कर्मचारी सुनील बाळकृष्ण पवार यांचा विजेच्या खांबावर धक्का बसून मृत्यू झाला. या घटनेला महावितरण कंपनीचा कंत्राटदार जबाबदार असून, त्याच्यावर गुन्हा दाखल करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याप्रकरणी ३० ऑक्टोबरला रास्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. ही दुर्घटना ४ ऑक्टोबरला गावठाण हद्दीत घडली होती. पवार हे महावितरण कंपनीकडे अकरा वर्षांपासून कार्यरत होते.

### जलवाहिनीसाठी रस्त्यांचे बेकायदा खोदकाम

**शेवगाव :** आचारसंहितेच्या आड ठेकेदारांकडून शहरात नियमबाह्य कामे करण्याचा उद्योग सुरू आहे. परवानगी न घेता रस्ते खोदले जात असून, झाडांची बेकायदा कत्तल केली जात आहे. राष्ट्रीय महामार्गालगत सध्या सुरू असलेल्या पाईपलाईनच्या खोदकामामुळे जनतेचा तोटाच अधिक होत आहे. संबंधित अधिकारी सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहेत. याबाबत सामाजिक कार्यकर्ते अरविंद सोनटक्के यांनी जिल्हाअधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, दोषी यंत्रणांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

### अमृतसागरचे ७ कोटी ९५ लाख उत्पादकांच्या खात्यावर

**संगमनेर :** तालुक्यातील अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक आणि प्रक्रिया संघास प्राथमिक दूध उत्पादक संस्थांनी गेल्या वर्षभरात पुरविलेल्या चांगल्या गुणप्रतिच्या दुधावर संघामार्फत दूध उत्पादकांना दीपावलीनिमित्त दूधभाव फरक, दसवडा दूध पेमेंट, कर्मचारी बोनस, ठेकेदार पेमेंट व इतर व्यापारी देणी पोटी एकूण सुमारे ७ कोटी ९५ लाख रुपये संबंधितांच्या खात्यावर वर्ग केल्याची माहिती संघाचे उपाध्यक्ष रावसाहेब वाकचौरे यांनी दिली.

### धातवाडीत हातभट्टीवर पोलिसांचा छापा

**कर्जत :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगरच्या भरारी पथकाने कर्जत तालुक्यातील धालवाडी शिवारात कारवाई करून तीन लाख ४५ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तीन गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने कळविले. कर्जत तालुक्यातील धालवाडी शिवारात अवैधरित्या हातभट्टी दारूची निर्मिती करून विक्री केली जात असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क यांना मिळाली होती.

# तब्बल १७ वर्षांनंतर भरली जुन्या सवंगड्याची शाळा!

## जून्या आठवणींना मिळाला उजाळा

**सुपा : प्रतिनिधी**

**रांजणगाव येथील श्री शिवाजी विद्यालयात तब्बल १७ वर्षांनंतर दहावीच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शालेय जीवनातील आठवणींना सर्वांनी उजाळा दिला. काहींनी आपल्या आनंदाश्रूंना वाट मोकळी करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक मुळे होते.**

आपले वय, पद, प्रतिष्ठा, कामाचा व्याप बाजूला ठेवून हे सर्व माजी विद्यार्थी आणि माजी शिक्षक अगदी उत्साहाने एकत्र जमले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. अनेक वर्षांनंतर आपण एकत्र भेटत आहोत. त्यामुळे ओळख लागते की नाही ही मनातील भावनाही होतीच; पण एकत्र आले आणि सर्वांनीच गळाभेट घेतली.कार्यक्रमाचे नेटके संयोजन चंद्रशेखर काळे , शीतल शिंदे, संतोष सरोदे , नितीन जाधव, महादेव चहल, भालसिंग भिवसेन, सागर गाढवे यांनी केले. कार्यक्रमासाठी आवर्जून सर्व माजी शिक्षक मुळे, बनकर, भारती, गाढवे, सलगर, मेहेत्रे, मेहेत्रे, घायाळ, केदारे, लाकूडझोडे, गाडेकर , विद्दमान मुख्याध्यापक टोणगे सर आणि विद्यमान कार्यरत असलेले सर्व शिक्षक उपस्थित होते.




■ शिवाजी विद्यालय रांजणगाव ता. पारनेर या शाळेतील विद्यार्थ्यांचे तब्बल १७ वर्षांनंतर स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. (छाया : शरद रसाळ, सुपा)


या कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून सध्याच्या मुलांना त्यांच्या भविष्यासाठी मार्गदर्शन केले. शाळेमध्ये सर्व मुलांसाठी स्नेहभोजनचे नियोजन केले आणि मुलांना चालना देण्यासाठी काही कोडी आणि काही प्रश्न विचारून उत्तर देणाऱ्याला चॉकलेट्स गिफ्ट देण्यात आले.तसेच शाळेतील सर्व मुलांना गिफ्ट म्हणून पेन्सिल किट आणि पेनही देण्यात आले.

यावेळी नितीन जाधव, संतोष सरोदे, सुनील गाढवे, अतुल गाडेकर, भिवसेन भालसिंग, चंद्रशेखर काळे, शीतल शिंदे आणि अश्विनी गाढवे ह्यांनी आपले मनोगत यक्त केले. शिक्षकांमध्ये मुळे सर, गाढवे सर, टोणगे सर आणि बनकर सर यांनी आपले मनोगत वक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन चंद्रशेखर काळे आणि शीतल शिंदे यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार संतोष सरोदे यांनी मानले.

# आकाश कंदील व्यावसायावर मंदीचे सावट

## निवडणूक आचारसंहितेचा परिणाम

**मुंबई : प्रतिनिधी**



**दिवाळीत घरोघरी आकाश कंदील लावले जातात. त्याचप्रमाणे दिवाळीच्या वेळी शहरांच्या चौकात, गल्लीत आपल्या राजकीय पक्षांचा प्रचारासाठीदेखील या कंदिलांचा वापर केला जातो. दिवाळीच्या काळात दोन ते तीन महिन्यांपासून कंदील बनवणार्या कारागिरांना मोठमोठ्या कंदीलांची ऑर्डर दिली जाते; मात्र सध्या निवडणुकीच्या काळात महाराष्ट्रात आचारसंहिता लागू झाल्याने राजकीय पक्षांच्या प्रचाराला काही मर्यादा आल्या आहेत.**

त्यामुळे आपल्या नेत्याचा फोटो, दिवाळीच्या शुभेच्छा, पक्षांचे चिन्ह वगैरे वापरण्यास निवडणूक आयोगाकडून काही बंधने आली आहेत. त्यामुळे यंदाच्या दिवाळीत राजकीय कंदिलांच्या ऑर्डर न मिळाल्याने कंदील तयार करणारे कारागीर आणि व्यावसायिकांना ऐन दिवाळीच्या काळात आर्थिक तंगी अनुभवावी लागत आहे.

दिवाळीच्या काळात कंदील व्यवसायाला बहर येतो. हंगामी व्यवसाय करणार्या व्यावसायिक, कारागिरांसाठी दिवाळी सण हा कमाईचा मोठा स्रोत असतो. घरगुती कंदिलातून मिळणारा नफा कमी असतो. त्याउलट राजकीय किंवा मंडळांसाठी बनवलेल्या कंदिलांची किंमत जास्त आणि त्यातून मिळणारा नफादेखील जास्त असतो. त्यामुळे लहान कंदिलांसोबतच मोठ्या कंदिलांनादेखील व्यावसायिकांकडून विशेष प्राधान्य दिले जाते; मात्र आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून कंदिलांचा ऑर्डर येणे बंद झाल्याचे कंदील व्यावसायिक सांगत आहेत. त्यामुळे दरवर्षी होणार्या आर्थिक उलाढालीवर काहीसा चाप बसल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. याचाच दुसरा परिणाम म्हणजे कारागिरांचे रोजगारदेखील यंदा कमी झाल्याचे व्यावसायिक सांगत आहेत. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांची आणि सर्वसामान्य नागरिकांची दिवाळी जरी धुमधडाक्यात साजरी होणार असली तरी कंदील व्यवसायावर मंदीचे सावट पसरलेले पाहायला मिळत आहे. वाढत्या महागाईचा परिणाम कंदील बनवण्यासाठी लागणार्या कच्च्या मालावरदेखील झाला आहे. त्यामुळे कंदिलांच्या किमती काहीशा वाढल्या आहेत; मात्र दिवाळीच्या सणात कंदील विकत घेण्यासाठीचा नागरिकांचा उत्साह कमी झालेला नाही.

# भेंड्यात एकल महिलांना किराणा वाटप

## उदयकाळ फाउंडेशन आयोजित किसानपुत्रांची भाऊबिज उपक्रम

**नेवासा : प्रतिनिधी**

**आर्थिक परिस्थिती अडचणीची असणाऱ्या एकल महिलांना साऊ एकल महिला समितीच्या माध्यमातून किराणा वाटप करण्यात आले. उदयकाळ फाउंडेशन आयोजित किसानपुत्रांची भाऊबिज या उपक्रमांतर्गत दिवाळीसाठी किराणा मालाचे मोफत वाटप रविवारी करण्यात आले.**



भेंडे येथील नागेबाबा भक्त निवासमध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कावीळ उपचार केंद्राचे संचालक सुनील वाबळे व प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र बाफना उपस्थित होते. तालुक्यातील एकल (विधवा) महिला व त्यांच्या मुलांच्या विविध समस्या सोडवणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, त्यासाठी लागणारी विविध कागदपत्र मिळवण्यास मदत करणे आदींसाठी समितीचे कार्यकर्ते सेवाभावी वृत्तीने कार्यरत असल्याचे कारभारी गरड यांनी प्रास्ताविकातून सांगितले.

समितीच्या माध्यमातून सोडवलेल्या विविध समस्या, दूर केलेल्या अडचणी व सहकार्य याबाबत येडूभाऊ सोनवणे, अप्पासाहेब वाबळे, भारत आरगडे यांनी माहिती दिली. एकल महिलांच्या समस्या सोडवताना काही आर्थिक सहकार्याची गरज लागल्यास आम्ही मदत करू, असे आश्वासन सुनील वाबळे व राजेंद्र बाफना यांनी याप्रसंगी दिले. एकल महिला समितीच्या समन्वयक रेणुका चौधरी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मेहेर स्कूलच्या ५०० विद्यार्थ्यांकडून स्नेहालयातील मुलांना दिवाळी भेट

## लाडू, चिवडा व दैनंदिन साहित्याचे किट




**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलच्या नर्सरी ते दहावीच्या ५०० विद्यार्थ्यांनी दिवाळीनिमित्त स्नेहालयातील निराधार व वंचित बालकांसाठी लाडू, चिवडा व दैनंदिन साहित्याचे किट तयार करून दिवाळी भेट दिले. या उपक्रमासाठी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, अजित बोरा आदींचे मार्गदर्शन लाभले.**

मेहेर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक भान ठेवून स्नेहालयातील निराधार, वंचित मुलांसाठी दिवाळी किटची भेट दिली. हा उपक्रम कौतुकास्पद आहे. वंचितांची दिवाळी गोड करण्यातच खरा आनंद असल्याचे प्रतिपादन मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी यांनी केले.

प्राचार्या प्रा. अनुरिता झगडे म्हणाले, मेहेर इंग्लिश स्कूलतर्फे वर्षभर विविध सण उत्सव साजरे करण्यात येतात. तसेच शैक्षणिक उपक्रमासोबतच विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची आवड निर्माण व्हावी, यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जातात. स्नेहालय या सामाजिक संस्थेने आवाहन केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन ''एक हात मदतीचा' हा उपक्रम हाती घेऊन दिवाळी किट तयार केली. आपल्याबरोबरच वंचितांची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने शाळेतील ५०० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. सत्यश्री चिलका यांनी आभार मानले.

# 'त्या' एका वक्तव्याने उमेदवारी हिरावली

## डॉ. सुजय विखे यांनी दिले स्पष्टिकरण

**संगमनेर :प्रतिनिधी**

**संगमनेर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्याविरोधात निवडणूक लढविण्यासाठी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी जोरदार मोर्चे बांधणी केली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असलेली ही जागा भाजपकडे घेण्यासाठी प्रयत्न सुरू होते. मात्र, शेवटच्या क्षणी ही जागा शिंदे गटाकडेट ठेवण्याचा निर्णय झाला. भाजपचे पदाधिकारी अमोल खताळ यांना शिंदे गटाकडून उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे डॉ. सुजय विखे यांची संधी हुकली.**

याचे कारण आता स्वत: सुजय विखे यांनीच सांगितले आहे. ते म्हणाले, धांदरफळ येथे माझ्या सभेच्या व्यासपीठावरून जे वादग्रस्त वक्तव्य झाले, त्यामुळे ही जागा भाजपला न देता शिंदे गटाकडेच ठेवण्याचा निर्णय झाला. शिवाय मी भाजपचा माजी खासदार असल्याने उमेदवारीसाठी शिंदे गटात जाणे संयुक्तिक नव्हते. ते आम्ही टाळले आणि संधी



हुकली.

शेवटपर्यंत निर्णय रखडलेल्या संगमनेरच्या जागेचा निर्णय झाला. त्यानंतर डॉ. सुजय विखे यांची संधी हुकल्याची चर्चा सुरू झाली. त्यावर बोलताना विखे यांनी ही कारण सांगितले आहे. पुढे ते म्हणाले, मात्र ही वेळ लोकशाही पद्धतीने नाही तर विरोधकांना दडपशाही पद्धतीने मिळाली आहे. माझ्या विरोधात त्या ठिकाणी नेरेटीव्ह सेट करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून करण्यात आला. त्यामुळे पक्षश्रेष्ठींकडून वरच्या पातळीवर निर्णय होऊन ती जागा शिवसेना शिंदे गटाला गेली असावी, असा माझा अंदाज असल्याचे सुजय विखे म्हणाले.

काही दिवसांपूर्वी संगमनेर तालुक्यातील धांदरफळ येथे डॉ. सुजय विखे यांच्या युवा संकल्प सभेत बोलताना भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते वसंत देशमुख यांनी थोरात यांच्या कन्या डॉ. जयश्री थोरात यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. त्यानंतर जाळपोळ, मोडतोड आणि नंतर आरोपप्रात्यारोप झाले होते. हीच घटना भोवल्याचे डॉ. विखे यांना आता वाटत आहे. यासंबंधी प्रसार माध्यमांशी बोलताना डॉ. विखे म्हणाले, संगमनेरची जागा भाजपला मिळावी यासाठी आम्ही शेवटपर्यंत प्रयत्न केला. त्यामुळे ही जागा अगदी शेवटच्या दिवशी जाहीर करण्यात आली. उरलेल्या आठ-दहा जागांवर वरच्या स्तरावर वाटाघाटी झाल्या. त्यात संगमनेरचाही समावेश होता. ज्या पद्धतीचा वातावरण त्या ठिकाणी निर्माण झाले, ते दुर्दैव आहे. आमची सर्व बाजूंनी तयारी होती. सर्वेक्षणही झाले होते. मात्र, जागा शिंदे गटाकडे गेली. मी भाजपचा माजी खासदार असल्याने उमेदवारीसाठी शिंदे गटात जाणे योग्य नव्हते. त्यामुळे अमोल खताळ यांचे नाव सूचविले आणि त्यांना उमेदवारी जाहीर झाली. धांदरफळमध्ये आमच्यावर हल्ला करणाऱ्यांवर क़डक कारवाई झाली नाही, तर आम्ही संगमनेरमध्ये आंदोलन करू, असा इशाराही डॉ. विखे यांनी दिला.

(पान १ वरून)

## पारनेर-नगर विधानसभेसाठी २१ अर्ज दाखल

उमेदवारी काशिनाथ दाते यांना जाहिर झाल्यानंतर मात्र बंडखोरीचा उद्रेक झाल्याचे पहावयास मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून इच्छुक असलेले सुजित झावरे, माधवराव लामखडे, विजय औटी यांनी हाती बंडाचा झेंडा घेत मंगळवारी आपले अपक्ष अर्ज दाखल केले. झावरे, लामखडे, औटी यांच्या व्यतिरिक्त मनसेचे अविनाश मुरलीधर पवार, अपक्ष खंडू विठ्ठल भुकन,रविंद्र विनायक पारधे, सचिन एकनाथ कोकाटे, सखाराम मालू सरक, ज्ञानेश्वर संजय भोगाडे, अविनाश उत्तम थोरात, शंकरप्रसाद दिगंबर गंधे यांनी मंगळवारी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

सोमवारी अर्ज खरेदी केलेल्या व्यक्ती पुढीलप्रमाणे : विजय बाळासाहेब कोरडे हिवरे कोरडा यांनी स्वत:साठी अपक्ष म्हणून १ अर्ज, रमेश पांडूरंग गाडगे विरोली यांनी स्वत:साठी अपक्ष म्हणून १ अर्ज, खंडू विठ्ठल भुकन स्वत:साठी अपक्ष म्हणून २ अर्ज, सखाराम मालू सरक नांदगांव, ता. नगर यांनी नाथसाहेब विठ्ठल सरक यांच्यासाठी राष्ट्रीय समाज पक्षासाठी १ अर्ज, ॲड. सचिन एकनाथ कोकाटे यांनी अपक्ष म्हणून स्वत:साठी १ अर्ज, संजय चिमाजी खेमनर शिंगवे नाईक ता. नगर यांनी स्वत:साठी बहुजन समाज पाट पक्षासाठी १ अर्ज, दीपक साहेबराव चांदणे वडगांव गुप्ता, ता. नगर यांनी स्वत:साठी एकलव्य आदिवासी बहुजन पार्टी पक्षासाठी १ अर्ज खरेदी केला.

### लामखडे, कार्ले, औटी यांचे शक्तीप्रदर्शन करीत अर्ज दाखल

केलल्या विजय सदाशिव औटी हे रॅलीने त्यांच्या संपर्क कार्यालयापासून लाल चौक परिसरात आले. तेथून पुढे ही रॅली बाजारपेठेतून तहसिल कार्यालयात पोहचली. बैलगाडीतून औटी हे अर्ज दाखल करण्यासाठी आले होते. त्यांच्या रॅलीमध्ये असलेल्या हलगी पथकाच्या ठेक्यावर रॅलीतील सहभागी युवक थिरकत होते. रॅलीमध्ये महिलांचाही समावेश होता.

अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेले नगर तालुक्यातील दोघे मा. जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे व संदेश कार्ले हे रॅलीने पारनेर शहरात पोहचले. पारंपारीक वाद्यांच्या गजरात ही रॅली खालीच वेस परिसरात पोहचल्यानंतर रोकडोबा हनुमानाचे दर्शन घेऊन मुख्य बाजारपेठेतून रॅली तहसिल कार्यालयात पोहचली. लामखडे, कार्ले यांच्या रॅलीमध्येही महिलांचा समावेश होता.

जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे, मनसेचे उमेदवार अविनाश पवार यांच्यासह इतर अपक्ष उमेदवारांनी मात्र कोणताही गाजावाजा न करता समर्थकांसह तहसिल कार्यालयात जात अर्ज दाखल केले.

# भरीव विकास कामांमुळे नगरकरांनी निवडणूक हाती घेतली

■ आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन ■ जगताप यांची तोफखाना, बागडपट्टीत विकास यात्रा



■ आमदार संग्राम जगताप यांच्या सर्जेपुरा, बागडपट्टी, तोफखाना परीसरातील प्रचार फेरीस नागरीकांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

नगर : प्रतिनिधी

**गेल्या दहा वर्षात नगर शहराचा प्रतिनिधी म्हणून विधिमंडळात काम करताना विविध विकास कामांसाठी आणलेला विकास निधी, जनतेच्या सुख, दुःखात सहभागी होत थेट संपर्क ठेवल्यामुळे नगरकरांशी ऋणानुबंध निर्माण झाल्याने यंदाची निवडणूक मतदारांनीच हाती घेतल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.**

विधानसभेच्या सार्वत्रीक निवडणूकीतील नगर शहरातील महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ तोफखाना,बागडपट्टी, सर्जेपुरा, मिसाळ गल्ली, सातभाई गल्ली,पावन गणपती मंदीर,ठाकूर गल्ली, परदेशी गल्ली, नवरंग गल्ली, शेरकर गल्ली, लोणार गल्ली, परिसरातील नागरीकांशी विकास यात्रेच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी ज्येष्ठ नेते अंबादास पंधाडे, मा. उपमहापौर दीपक सुळ, मालनताई ढोणे, मा. नगरसेवक धनंजय जाधव,कालिंदी केसकर, गुलाबराव पवार, सारंग पंधाडे, सुरज जाधव, पोपट पाथरे,अजय साळवे,राजेंद्र बोगा, अभिजित चिप्पा, श्वेता पंधाडे आर्दीसह नागरीक व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

तोफखाना, बागडपट्टी, सर्जेपुरा परिसरातील नागरीकांनी माझे उस्फुर्त स्वागत केल्याने आपण भारावून गेलो असल्याचे सांगत यावेळी बोलताना आ. जगताप म्हणाले, जनतेच्या या प्रेमामुळे माझा विजय निश्चित झाला असून मला तिसऱ्यांदा नगरकरांची सेवा करण्याची संधी मिळणार आहे. विकास कामांच्या मुद्यावर आपण ही निवडणूक लढवित असून केलेली विकास कामे, नागरीकांच्या घरापर्यंत घेउन जाण्यास मी यशस्वी झालो आहे. नगरकरांनी दिलेल्या मतरूपी आशीर्वादाच्या माध्यमातून नगरकरांची सेवाकरण्यासाठी मला उर्जा व प्रेम मिळत असल्याचे जगताप यांनी सांगितले.

### लाडक्या बहिणींची खंबीर साथ

आ. जगताप यांनी दिल्ली गेट येथील शनि गणपती मंदिरात दर्शन घेत प्रचारास प्रारंभ केला. प्रचारास प्रारंभ झाल्यानंतर बागडपट्टीत महिलांनी ठिकठिकाणी त्यांचे औक्षण करीत पेढा भरवत स्वागत केले. लाडक्या बहिणी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या असल्याची ग्वाही यावेळी विविध महिलांनी दिली.

### फुलांचा वर्षाव आणि फटाक्यांची आतिषबाजी

आ. संग्राम जगताप यांची प्रचार फेरी तोफखाना,बागडपट्टी, सर्जेपुरा परिसरात पोहचल्यानंतर ठिकठिकाणी नागरीकांनी त्यांचे उस्फुर्तपणे स्वागत केले. फुलांचा वर्षाव आणि फटाक्यांची आतिषबाजी करीत नगरकरांनी आम्ही संग्राम जगताप यांच्यासोबत असल्याचा शब्द दिला.

### वृध्देचा डोक्यावर हात ठेऊन आशीर्वाद

प्रचार फेरीदरम्यान वृध्द महिला, युवती, महिला, लहान मुलांनीही आ.जगताप यांचे उस्फुर्त स्वागत केले. वध्द महिलांनी डोक्यावर हात ठेवत आ. जगताप यांना आशीर्वाद दिले. युवक, युवती, लहान मुले, मुलींना जगताप यांच्यासमवेत सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही.

# जिल्हा ग्रंथालय संघाच्या अध्यक्षपदी सुरेंद्र शिंदे

उपाध्यक्षपदी सदाशिव शेळके यांची निवड




सुपा : प्रतिनिधी

**अहमदनगर जिल्हा ग्रंथालय संघाच्या अध्यक्षपदी सुरेंद्र शिंदे तर उपाध्यक्षपदी सदाशिवराव शेळके यांची अहिल्यानगर येथे झालेल्या जिल्हा ग्रंथालय संघाच्या विशेष सर्वसाधारण सभेत एकमताने निवड करण्यात आली.**

नाशिक विभाग ग्रंथालय संघाच्या सूचनेनुसार सन २०२३ ते २०२६ या कालावधीसाठी कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर ग्रंथालय संघाचे संस्थापक कार्यवाहक सदाशिवराव शेळके हे होते.प्रमुख कार्यवाह म्हणून जामखेड येथील ॲड.अजिनाथ जायभाय,तर कोषाध्यक्षपदी पाथर्डीचे विष्णुपंत पवार यांची निवड करण्यात आली.

१९७३ साली स्थापन झालेला जिल्हा ग्रंथालय संघ अहमदनगर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालये, कार्यकर्ते, ग्रंथलयीन कर्मचारी यांची शिखर संस्था असून, काही निष्क्रिय कार्यकर्त्यामुळे कामकाजात विस्कळीतपणा आला होता. परंतु संस्थापक सदस्य व नव्या पिढीतील क्रियाशील कार्यकर्ते यांनी जिल्हा ग्रंथालय संघ या शिखर संस्थेच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळ जोमाने सुरू केली असून वाचनसंस्कृती रूजविण्याचा निर्धार केला आहे.

### नवनियुक्त पदाधिकारी

संचालक मंडळात पनाजी कदम (कर्जत), नामदेव गरड (शेवगाव), भाऊसाहेब गवळी (पारनेर) संभाजी पवार (राहुरी), अमोल इथापे,(अहिल्यानगर),सुखदेव मोहिते (अकोले),पारसनाथ आहेर (कोपरगाव), तुषार गायकर (संगमनेर), बाळासाहेब शेलार (श्रीरामपूर), दिपक आगळे (नेवासा), संस्थापक संचालक ग्यानदेव आनारसे विकास बांगर, राजेंद्र तरटे, शशिकांत झंजाड, नवनाथ म्हस्के, यांची निवड करण्यात आली.

### संस्थेचे सभासद होण्याचे आवाहन

अहमदनगर जिल्हा ग्रंथालय संघ या पन्नास वर्षे जुन्या संस्थेचे पुनर्जीवन झाले असुन जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रंथालय चालकांनी या संस्थेचे सभासद व्हावे असे आव्हान विश्वस्थ मंडळांनी केले आहे.

सुरेंद्र शिंदे, अध्यक्ष

यावेळी अध्यक्षपदी निवड झालेले सुरेंद्र शिंदे म्हणाले की, जिल्हा ग्रंथालय संघाच्या संस्थापक मंडळीचा हेतू व वारसा पुढे नेण्याचा मी सर्वांच्या सहकार्यातून प्रयत्न करेल अशी ग्वाही देवून निवडीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.जिल्ह्यातील सर्व सभासद सभेस उपस्थित होते.प्रास्ताविक ॲड.अजिनाथ जायभाय यांनी तर सूत्रसंचलन पनाजी कदम यांनी केले.आभार विष्णूपंत पवार यांनी मानले.

जिल्हा ग्रंथालय संघाचे काम थंडावले होते. पण संस्थापक संचालक व नवीन पिढीतील क्रियाशील कार्यकर्ते यांनी मिळून सर्व ग्रंथालये,कर्मचारी यांना नियमाप्रमाणे सदस्यत्व देण्याचा निर्णय जाहीर करताच उपस्थितांनी एकच जल्लोष केला.


# विद्युत दिव्यांच्या प्रकाशाने लखलखली जुनी पेठ !

निघोज : प्रतिनिधी

**ऐन दिवाळीच्या पर्वात अंधाराचे साम्राज्य दूर होवून निघोजची जुनी बाजारपेठ विद्युत दिव्यांनी उजळून निघाल्याने ग्रामस्थ व व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

निघोजच्या जुन्या पेठेत लाईटचा लखलखाट झाला असून निघोजची मशिदी ते राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या मंदिरापर्यंत तसेच श्रीराम मंदीर ते जिल्हा परिषद मराठी शाळेपर्यंत अशाप्रकारे मुस्लिम समाज निधी अंतर्गत मोठ्या प्रमाणात विजेचे जास्त क्षमतेचे विजेरी हायमॅस्क बसवीण्यात आले आहेत.आचारसंहिता सुरू होण्याअगोदर या विकास कामांचे भूमिपूजन ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले होते.

तब्बल पन्नास पेक्षा जास्त विजेचे तीस फुटी खांब उभे करण्यात येऊन सोमवारी रोजी रात्री ही लाईट सुरू करण्यात आली आहे. गेली अनेक दिवसांपासून जुन्या पेठेत अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले होते. राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे मंदिर, व्यापारी असोसिएशन



अंतर्गत अनेक व्यवसायिक, शरदचंद्रजी पवार अभ्यासिका इमारत, पत्रकार संघ विभागीय कार्यालय, ग्रामपंचायत इमारत व चौक, मेडिकल, वैद्यकीय व्यवसायीक, छोटे मोठ्या ईमारती व व्यवसायिक मोठ्या प्रमाणात असल्याने या ठिकाणी प्रखर लाईटची गरज होती ती पुर्ण केल्याबद्दल ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच संबंधीत लोकप्रतिनिधी यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

बाळासाहेब निचीत, सुमनताई कवाद, योगेश खाडे, निलेश जंगम, गणेश खाडे आदीनी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले असून विधानसभा निवडणुकी नंतर श्रद्धा ड्रायक्लीनर्स ॲन्ड लॉन्ड्री ते शेवाळे आळी कोष्टी गल्ली पर्यंतचा अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करण्याची मागणी संबंधित ग्रामस्थांनी केली आहे.

# चिचोंडी पाटील घटनेतील आरोपीला कठोर शिक्षा करा

अंगणवाडी सेविका मदतनीस एकजूट सेवा संघाच्या वतीने अधीक्षकांना निवेदन

पारनेर : प्रतिनिधी

**नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथील मारुती वाडी या ठिकाणी अंगणवाडी सेविकेवर अत्याचार करून तिची निर्घुण हत्या करण्यात आली या निषेधार्थ अंगणवाडी सेविका मदतनीस एकजूट सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने संघटनेच्या अध्यक्षा जयश्रीताई झावरे-वाबळे यांनी अहिल्यानगर पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले.**



या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की गुरुवार दि. २४ ऑक्टोंबर २०२४ रोजी, चिचोंडी पाटील, तालुका जिल्हा अहिल्यानगर येथे आमच्या अंगणवाडी सेविका भगिनी कै. उमा महेश पवार वय ३२ या अंगणवाडी केंद्रात ऑन ड्युटी असताना समाजातील काही विकृत नराधमाने त्यांच्यावर अत्याचार करून त्यांची निर्गुण हत्या केलेली आहे.

अधीक्षक साहेब मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेचा आम्ही जाहीर निषेध करतो तसेच सदर घटनेतील जे कोणी आरोपी असतील त्यांना कडक शिक्षा करून तातडीने पुढील कार्यवाही करावी अशी युनियनच्या वतीने विनंती करत आहोत जेणेकरून पुढील काळात आमच्या कोणत्याही सेविका मदतनीस ताई वर अशा प्रकारचा अन्याय होणार नाही आणि आणखी कोणत्या ताईचा असा अमानुष बळी जाणार नाही. पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले यावेळी अंगणवाडी सेविका मदतनीस एकजूट सेवा संघाच्या अध्यक्षा जयश्रीताई झावरे-वाबळे, संगीता गागरे, जयश्री टेमकर, स्नेहल सग्गम, आदी उपस्थित होत्या. संघटनेचे पदाधिकारी छाया सरबंदे, वर्षा पारधी, अनिता दातीर, संगीता कुदनर, पंचशीला मेश्राम, रोहिणी शेडवळ, या सर्वांनी चिचोंडी पाटील येथील घडलेल्या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त केला आहे.

चिचोंडी पाटील येथील आमच्या भगिनीवर अत्याचार करत तिची निर्घुण हत्या केली. ही घटना दुर्दैवी आहे या घटनेतील आरोपींना शासनाने फाशीची शिक्षा द्यावी. अशी मागणी आम्ही अंगणवाडी सेविका मदतनीस एकजूट सेवा संघाच्या वतीने करत आहोत.

जयश्रीताई झावरे-वाबळे
अध्यक्षा : अंगणवाडी सेवा एकजूट संघ

# गजी नृत्याच्या तालावर रंगला मेंढपाळांचा 'खेळ' !

सिन्नरच्या खेळाला दीपक लंके यांची भेट



सिन्नर : विशेष प्रतिनिधी

**वर्षभरातील पावसाळयातील काही महिने गावाकडे मेंढयांची गुजराण करून पुढील प्रवासाठी पुन्हा कोकणवाडयाकडे परतू लागणाऱ्या मेंढपाळांचा पारंपारिक वाद्यांच्या गजरात गजी नृत्याबरोबर उत्साहात खेळ रंगला.तालुक्यातील ढवळपुरी येथील मेंढपाळ बांधवांच्या सिन्नरमध्ये पार पडलेल्या या खेळासाठी खा. नीलेश लंके यांचे बंधू दीपक लंके यांनी भेट देत मेंढपाळ बांधवांना शुभेच्छा दिल्या.**

पारनेर तालुक्यातील ढवळपुरीसह पळशी, वनकुटे, गाजदीपुर, कुरूंद, कोहकडी, राळेगणथेरपाळ, वारणवाडी, खारवाडी, धोत्रे, कोकणेवाडा, कोळपेवाडा या भागात मेंढपाळ व्यवसाय मोठया प्रमाणावर चालतो. पावसाळयाच्या दिवसांत घाट माथ्यावर मोठया प्रमाणात पाऊस सुरू झाल्यानंतर हे मेंढपाळ तीन ते चार महिने मेंढया चारण्यासाठी आपल्या गावी असतात. कोकण व घाटमाथ्यावरील पावसाने उघडीप दिल्यानंतर मेंढयांसह मेंढपाळांचा कोकणाकडे प्रवास सुरू होतो. चाकण, आंबेगांव, भिमाशंकर, मुरबाड या भागापासून नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुक्यापर्यंत हे मेंढपाळ वास्तव्यास असतात.

दीपक लंके यांच्यासह नीलेश लंके मेंढपाळ कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष गणेश हाके, पळशी सरपंच प्रकाश राठोड, राजेश तराळ, बापूसाहेब चत्तर आदींनी मेंढपाळ बांधवांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. भाउ कोळपे, दीपक कोळपे, सदू हाके यांनी त्यांचे स्वागत केले.

### बिरोबा-सतोबाचा आशीर्वाद

मुळ गावावरून कोकण माथ्याकडे परतीच्या प्रवासासाठी निघणारे मेंढपाळ बांधव आपले ग्रामदैवत बिरोबा, सतोबाचा आशीर्वाद घेतात. मेंढपाळीसाठी आम्ही कोकण व घाट माथ्याकडे निघालो आहोत आपला आशीर्वाद आमच्या पाठीवर यावर्षीही राहू दे व पुन्हा सुखरूप गावाकडे परतू दे असे साकडेही सतोबा-बिरोबाला घातले जाते.

### बरबटाचा बेत

यानिमित्ताने आजू बाजूच्या वाडयांवरील पै पाहुण्यांना खेळासाठी निमंत्रण दिले जाते. यावेळी कळपातीलच मेंढयाचा बळी देऊन देवाला नैवद्य दाखविला जातो. त्यानंतर कोकणवाडयावर पंगती झडतात. या कालवणाला बरबाट असे संबोधले जाते.

### गुलाल, भंडारची उधळण आणि बिरोबाचा जयघोष

देवाचा नवैद्य झाल्यानंतर लहान मुलांच्या पंगती व सुवासिनींचा मान दाखवून झाल्यानंतर मेंढपाळांच्या पंगतीनंतर ढोल डफडयाच्या तालावर गजी नृत्य सादर केले जाते. अगदी तरूणांपासून ते वयोवध्द मेंढपाळ पारंपारीक वाद्याच्या तालावर गजी नत्यावर ठेका धरतात. मध्येच गुलालाची, भंडाराची उधळण करीत बिरोबाच्या नावाने चांगभलंचा जयघोषाने आसमंत दुमदुमून जातो.

# नवी एमआयडीसी शहर विकासासाठी बुस्टर डोस !

■ आ. संग्राम जगताप यांची विकास यात्रा ■ उद्योजकांशी साधला संवाद




नगर : प्रतिनिधी

**औद्योगिक क्षेत्राला चालना देण्यासाठी महायुती सरकारने नगरमध्ये ६०० एकर जागेसह नव्या एमआयडीसीला मंजुरी दिली आहे. या वसाहतीमध्ये मोठे औद्योगिक प्रकल्प आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. औद्योगिक वसाहतीचा हा प्रकल्प नगर शहर विकासासाठी बुस्टर डोस ठरेल असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.**

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीतील नगर शहर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांनी नगर विकास यात्रेदरम्यान इंडस्ट्रील इस्टेटमधील उद्योजकांशी संवाद साधून निवडणूकीतील आपला अजेंडा त्यांच्यासमोर मांडला. यावेळी इंडस्ट्रियल इस्टेटचे चेअरमन अरविंद गुंदेचा यांनी जगताप यांचे स्वागत करून सन्मान केला. याप्रसंगी व्हाईस चेअरमन नीलेश मेहेर, संचालक संतोष बोथरा, मेहुल भंडारी, संतोष बोरा, नितीन पटवा, सतीश बोरा, मा. उपमहापौर गणेश भोसले, मा. नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा यांच्यासह इंडस्टियल इस्टेट मधील उद्योजक उपस्थित होते.

यावेळी बोलताना जगताप म्हणाले, या एमआयडीसीमुळे लहान-मोठया उद्योगांना चालना मिळून रोजगार निमती होणारआहे. इंडस्टियल इस्टेटसंदर्भातील अनेक प्रश्न, समस्या उद्योजकांनी आपल्याकडे मांडल्यानंतर त्या सोडविण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न केला आहे. इंडस्ट्रियल इस्टेटमधील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्यात आल्याने येथील वर्दळ वाढणार आहे.

### मला आशीर्वाद द्या

शहराचा चोहोबाजूंनी विकास होत असल्याने, चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध असल्याने शहरात लोकवस्ती वाढत आहे. विकासाच्या चाकाची गती वाढविण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान देणे गरजेचे आहे. विधानसभेच्या निवडणूकीला मी तिसऱ्यांदा सामोरे जात असून मला पुन्हा एकदा आशीर्वाद द्या.

आमदार संग्राम जगताप
उमेदवार, महायुती

### उद्योजक, कर्मचाऱ्यांचे पाठबळ

आ. संग्राम जगताप यांनी गेल्या दहा वर्षात इंडस्ट्रियल इस्टेट संदर्भातील प्रश्न, समस्या दुर करण्यासाठी प्राधान्य दिले. विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. शहरामध्ये कोटयावधींची विकास कामे माग लावून शहराला विकासाचे व्हिजन दिले आहे. जगताप यांना तिसऱ्यांदा विधानसभेत पाठविण्यासाठी इंडस्टियल इस्टेटमधील सर्व उद्योजक आपल्या परिवार तसेच कर्मचाऱ्यांसह त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.

अरविंद गुंदेचा, चेअरमन
इंडस्ट्रियल इस्टेट

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com